# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **08/01/2023**

**Brief of the work done :-**

ATM मध्ये तांत्रिक बिघाड निर्माण करून बँकांना 7.55 लाखांचा गंडा घालणारी आंतरराज्यीय टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात.

देशोन्नती

# बँकांना गंडविणारी आंतरराज्यीय टोळी पोलीसांच्या जाळयात

## एटीएम मध्ये बिघाड करून करत होते चोरी

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ▪ एटीएम मशीनद्वारे व्यवहार करत असतांना मशीन मधून रोख रक्कम वितरणाचे वेळी वितरण व्यवस्थेत बिघाड करून पैसे ओढून घेऊन बँकेचा व्यवहार अयशस्वी दर्शवून बँकेच्या वेगवेगळया एटीएम मशीनद्वारे पैसे काढून बँकांना लाखोंचा गंडा घालणारी आंतरराज्यीय टोळी पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.



दरम्यान पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे अप.क्र.९७९/२२, कलम ४२० भादंवि सहकलम ४३ (ई)(एच), ६६ (सी) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये दाखल तक्रारीनुसार दि वाशिम अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, वाशिम यांच्या अकोला, अमरावती, वाशिम, मानोरा व रिसोड येथे असणाऱ्या एटीएम मशीनद्वारे व्यवहार करत असतांना मशीन मधून रोख रक्कम वितरणाचे वेळी दोन बोटे डीस्पेन्सिंग शटरमध्ये ठेवून त्या बोटांच्या सहाय्याने वितरण यंत्रणेच्या रोलसीलला आत ढकलून मशीनमध्ये बिघाड केला जात होता. त्यामुळे पैसे काढूनसुद्धा बँकेचा व्यवहार अयशस्वी दर्शवून तब्बल ७.५५ लाखांची रक्कम काढून घेतली होती. कुठलेही धागेदोरे उपलब्ध नसतांना सदर गुन्ह्याचा तांत्रिक बाबींच्या आधारे तपास केला असता १० वेगवेगळया बँकांच्या खात्यांशी संलग्न असलेले १९एटीएम कार्डद्वारे ७६ वेळा वेगवेगळया एटीएम मशीनमधून व्यवहार करून सदरची रक्कम काढण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

सदर एटीएम कार्डशी संबंधित असलेल्या मोबाईल